Prabhu Shri Ramchnadra Shikshan Prasarak Mandal Tondgaon's

Affiliated to Sant Gadge Baba Amravati University, Amravati

# Matoshri Shantabai Gote Art's, Commerce & Science College, Washim

# MARATHI

# Department

# Departmental Activities

## Session :- 2019-2020

# वक्तृत्व स्पर्धा परीक्षक

ठिकाण - नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशीम दि. 26/08/2019

---

जिल्हा क्रीडा अधिकारी वाशीम व शिक्षणाधिकरी माध्यमिक, जि. प. वाशीम यांच्या संयुक्त विद्यमाने दि. 26 /08/ 2019 रोजी 'युवा जागर महाराष्ट्रावर बोलू काही' जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. ही स्पर्धा विद्यार्थ्यांमधील वक्तृत्व गुण वाढीस लावण्यासाठी घेण्यात आली होती. या स्पर्धेमध्ये शाळा, महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. या स्पर्धेचे परीक्षक म्हणून डॉ. विष्णू लांडे, डॉ. लता जावळे व डॉ. शुभांगी दामले यांनी कार्य केले.

महाराष्ट्र शासन

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम.

जिल्हा क्रीडा संकुल, बस स्टँड मागील, मिरवीला लाईन, वाशिम.
dso.washim@rediffmail.com, dso.washim23@gmail.com;

दिनांक :- २६/०८/२०१९

प्रति,
मा प्राचार्य/मुख्याध्यापक,
मातोश्री शांताबाई गोरे ~~कनिष्ठ~~ महाविद्यालय
वाशिम

विषय :- युवा जागर महाराष्ट्रावर बोलु काही या कार्यक्रमाचे अंतर्गत वक्तृत्व स्पर्धा व युवा संसद आयोजनाबाबत.
परिषदकांची सेवा मिळणेबाबत.

संदर्भ :- शासन निर्णय शालेय शिक्षण व क्रीडा विभाग क्रमांक युकमो/२०१९/प्र.क्र २१९/ क्रीयुसे-३ दि.२४ जुलै २०१९

महोदय,

उपरोक्त विषयांच्या संदर्भीय पत्राच्या अनुषंघाने आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्र.१ अन्वयेनुसार सन २०१९-२० या सत्राचे युवा जागर महाराष्ट्रावर बोलु काही या कार्यक्रमाचे अंतर्गत जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा व युवा संसद कार्यक्रमाचे आयोजन दि २६/०८/२०१९ रोजी सकाळी 9.30 वाजता नियोजन हॉल, जिल्हाधिकारी कार्यालय, काटा रोड वाशिम येथे आयोजीत करण्यात येत आहे. तरी आपल्या अधिनस्त असलेल्या डॉ.श्री विष्णु लांडे, मराठी भाषा विभाग प्रमुख यांना दि.२६/०८/२०१९ ला सकाळी ९.३० वाजता जिल्हा नियोजन सभागृह येथे उपस्थित राहण्याबाबत आदेशित करुन सदर शासकीय उपक्रमास सहकार्य करावे, हि विनंती.

आपला विश्वासु

(चंद्रकांत उप्पलवार)
जिल्हा क्रीडा अधिकारी, वाशिम

प्रतिलिपी माहितीस्तव सविनय सादर,
१. मा.जिल्हाधिकारी, वाशिम
२. मा.शिक्षणाधिकारी(माध्य) जि.प. वाशिम.
३ मा.गटशिक्षणाधिकारी पंचायत समिती,

Assistant Professor
Matoshri Shantabai Gote
Arts,Commerce& Science College,
Washim Dist. Washim

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI COLLEGE WASHIM

3|D/2018-19 file suraj/Official letter

# जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, वाशिम

रिव्हील लाईन्स, वाशिम

ई-मेल: dso.washim२३@gmail.com दूरध्वनी: ०७२५२-२३१७५२

जा.क्र.५२२/युवा जागर/रायुसंस्था/निवड/२०१९-२० दि.२६/०८/२०१९

प्रति,
मा.प्राचार्य,
मातोश्री शांताबाई गोटे महा. वाशिम

## उपस्थिती प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री. डॉ.विष्णु लांडे, मराठी विभाग प्रमुख हे जिल्हास्तरीय वक्तृत्व स्पर्धा व युवा संसद स्पर्धा दिनांक २६ ऑगस्ट २०१९ ला आयोजीत नियोजन भवन, जिल्हाधिकारी कार्यालय, वाशिम येथे स्पर्धा परिक्षक म्हणुन उपस्थित होत्या व दि.२६ ऑगस्ट २०१९ रोजी सायं ५.०० वाजता त्यांना कार्यमुक्त करण्यात येत आहे.

आपण शासकीय उपक्रमास श्री. डॉ.विष्णु लांडे, मराठी विभाग प्रमुख यांना कार्यमुक्त करुन सहकार्य केल्याबद्दल आपले हार्दिक आभार.

करिता उपस्थिती प्रमाणपत्र देण्यात येत आहे, कृपया स्विकार व्हावा हि विनंती.

आपला विश्वास

(ए.के.रा.ग्यलवार)
प्र.जिल्हा क्रीडा अधिकारी,
वाशिम

दिनांक - २६/०८/२०१९
ठिकाण - वाशिम

REDMI NOTE 5 PRO
MI DUAL CAMERA



MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS COMMERCE COLLEGE * WASHIM *

वक्तृत्व स्पर्धेतील विजयी स्पर्धक, मंचावर शिक्षणाधिकारी व परीक्षक

वक्तृत्व स्पर्धेप्रसंगी आयोजक हे परीक्षकांचे स्वागत करताना

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI. COLLEGE * WASHIM *

वक्तृत्व स्पर्धेतील विजयी स्पर्धक, मंचावर शिक्षणाधिकारी व परीक्षक

वक्तृत्व स्पर्धेप्रसंगी आयोजक हे परीक्षकांचे स्वागत करताना

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI. COLLEGE * WASHIM *

वक्तृत्व स्पर्धेप्रसंगी उपस्थित शिक्षणाधिकारी व परीक्षक

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI COLLEGE * WASHIM *

# मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

## वाशीम जि. वाशीम

### मराठी विभाग

## मराठी भाषाभ्यास मंडळाची स्थापना अहवाल

**दि. 14 सप्टे. 2019**

---

स्थानिक मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात दि. 14 सप्टे. 2019 रोजी हिंदी दिनाच्या निमित्ताने हिंदी, उर्दू व मराठी या भाषाभ्यास मंडळाची स्थापना करण्यात आली. याप्रसंगी आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे हे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये डॉ.एस. व्ही.रूक्के, डॉ. फिरोज खान व डॉ. विष्णू लांडे यांची उपस्थिती होती. मराठी अभ्यासमंडळाची कार्यकारिणी डॉ. विष्णू लांडे यांनी जाहीर केली. त्यामध्ये अध्यक्ष म्हणून मुस्कान नौरंगाबादी, उपाध्यक्ष म्हणून वर्षा पायघण, सचिवपदी प्रदीप पट्टेबहादूर, कोषाध्यक्षपदी आसिफ दर्गीवाले यांची निवड करण्यात आली. तर सदस्य म्हणून भीमराव इंगोले, सीमा वैद्य, आसिफ भवानीवाले, गायत्री कोरडे, प्रसाद ढेंगळे व वैभव मापारी यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मुस्कान नौरंगाबादी तर उपस्थितांचे आभार वर्षा पायघण हिने मानले.



वाशीम : गोटे महाविद्यालयात हिंदी दिवस साजरा करताना विद्यार्थी.

# गोटे महाविद्यालयात हिंदी दिवस उत्साहात

वाशीम, ता. १९ : मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जी. एस. कुबडे हे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये हिंदी विभाग प्रमुख डॉ. एस. व्ही. रुक्के, डॉ. फिरोज खान व डॉ. व्ही. एन. लांडे हे होते.

आपल्या प्रास्ताविकामध्ये डॉ. एस. व्ही. रुक्के यांनी हिंदी भाषा हि आंतरराष्ट्रीय भाषा झाली पाहिजे असे सांगत हिंदी दिनाचे महत्व विशद केले. याप्रसंगी त्यांनी हिंदी अभ्यास मंडळाची कार्यकारणी घोषित केली. यामध्ये अध्यक्ष म्हणून साक्षी लोध, उपाध्यक्ष म्हणून जयभीम सरकटे, सचिवपदी गोपाल पंडित कोषाध्यक्षपदी रोशनी यादव यांची तर सदस्य म्हणून सोहेल खान पठाण, फरहाट अली, सौरव भगत, शुभम वानखेडे, सोपान शिंदे व मयूर लांडकर यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी इंग्रजी अभ्यास मंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली. यामध्ये अध्यक्ष म्हणून मीना डुबे, उपाध्यक्ष म्हणून जवेरिया सदफ, सचिव पदी समरीन परवीन, कोषाध्यक्ष पदी वंदना राऊत यांची तर सदस्य म्हणून जयश्री कांबळे, सपना वानखेडे, हर्षा पट्टेबहादूर, अंजली अंभोरे, सानिया अमरीन व रोशनी डुबे यांची निवड करण्यात आली. डॉ. फिरोज खान यांनी बज्म उर्दू अदब अभ्यास मंडळाची कार्यकारणी घोषित केली. यामध्ये अध्यक्ष म्हणून तन्वीर अली, उपाध्यक्ष म्हणून जवेरिया सदफ, सचिव पदी आरिया गजल, सहसचिव फौजिया परवीन, कोषाध्यक्ष पदी समरीन परवीन यांची तर सदस्य म्हणून सुहाना परवीन, मिस्बाह परवीन, तसनीम परवीन, सिमरन बी, सानिया समरीन, मुस्कान मोहम्मद यांची निवड करण्यात आली, तर मराठी अभ्यास मंडळाची कार्यकारणी डॉ. व्ही. एन. लांडे यांनी घोषित केली. यामध्ये अध्यक्ष म्हणून मुस्कान नौरंगाबादी, उपाध्यक्ष म्हणून वर्षा पायघन, सचिवपदी प्रदीप पट्टेबहादूर, सहसचिव म्हणून प्रमोद गायकवाड, कोषाध्यक्ष पदी असिफ दर्गावाले यांची तर सदस्य म्हणून भीमराव इंगोले, सीमा लेंधे, असिफ भवानीवाले, गायत्री कोरडे, प्रसाद ढेंगळे, व वैभव मापारी यांची निवड करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्र संचालन मुस्कान नौरंगाबादी हिने केले तर उपस्थितांचे आभार वर्षा पायघन हिने मानले.

दि. 20/09/2019 पे. 21 माय

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI COLLEGE ★ WASHIM ★

# एम.एस.गोटे महाविद्यालयात हिंदी दिवस साजरा

तालुका प्रतिनिधी /१८ सप्टेंबर

वाशिम : स्थानिक मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात १४ सप्टेंबर रोजी हिंदी दिन उत्साहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. जी. एस. कुंबडे हे होते. तर प्रमुख उपस्थितीमध्ये हिंदी विभाग प्रमुख डॉ. एस. व्ही. रुकके, डॉ. फिरोज खान व डॉ. व्ही. एन. लांडे हे होते.

कार्यक्रमाची सुरुवात संत गाडगेबाबांच्या प्रतिमेच्या पुजनाने करण्यात आली. आपल्या प्रास्ताविकामध्ये डॉ. एस. व्ही. रुकके यांनी हिंदी भाषा ही आंतरराष्ट्रीय भाषा झाली पाहिजे असे सांगत हिंदी दिनाचे महत्व विशद केले. याप्रसंगी त्यांनी हिंदी अभ्यास मंडळाची कार्यकारणी घोषित केली. यामध्ये अध्यक्ष पदी साक्षी लोध, उपाध्यक्षपदी जयश्री सरकटे, सचिवपदी गोपाल पंडित, कोषाध्यक्षपदी रोशनी यादव यांची तर सदस्य म्हणून सोहेल खान पठाण, फरहाद अली, सौरव मुगत शुभम वानखेडे, सोपान शिंदे व मयूर लोडकर यांची निवड करण्यात आली. याप्रसंगी इंग्रजी अभ्यास मंडळाची कार्यकारणी सुद्धा घोषित केली. यामध्ये अध्यक्षपदी मीना डूबे, उपाध्यक्ष पदी जवेरिया सदफ, सचिवपदी समरीन परवीन, कोषाध्यक्षपदी वंदना राऊत यांची तर सदस्य म्हणून जयश्री काबले, सपना वानखेडे, हर्षा पट्टेबहादर, अंजली अंभोरे, सानिया अमरीन व रोशनी डुबे यांची निवड करण्यात आली. डॉ. फिरोज खान यांनी केले. उर्दू अदब अभ्यास मंडळाची कार्यकारणी घोषित केली. यामध्ये अध्यक्षपदी तन्वीर अली, उपाध्यक्षपदी जवेरिया सदफ, सचिवपदी आशिया गझल, सहसचिव फौजिया परवीन, कोषाध्यक्षपदी समरीन परवीन यांची सदस्य म्हणून सुहाना परवीन, मिरवाह परवीन, तसनीम परवीन, सिमरन बी, सानिया समरीन, मुस्कान मोहम्मद यांची निवड करण्यात आली. तर मराठी अभ्यास मंडळाची कार्यकारणी डॉ. व्ही. एन. लांडे यांनी घोषित केली. यामध्ये अध्यक्षपदी मुस्कान नौरंगाबादी, उपाध्यक्षपदी वर्षा पायधन, सचिवपदी प्रदीप पटेबहादूर, सहसचिव प्रमोद गायकवाड, कोषाध्यक्षपदी असिफ दर्गीवाले यांची तर सदस्य म्हणून भीमराव इंगोले, सीमा वैद्य, असिफ मवानीवाले, गायत्री कोरडे, प्रसाद देगळे, व वैभव मापारी यांची निवड करण्यात आली.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मुस्कान नौरंगाबादी यांनी केले तर उपस्थितांचे आभार वर्षा पायधन यांनी केले आहे.

वार्ताहर / १८

आसेगांव
विसर्जन सो
जल्लोष करुन
वेळी पुढच्या
जयघोष क
हनुमान मंदिर
मिरवणूक का
स्टॅन्ड रोड रि
टाळमृदुगांच्या
निनादात पैन
नेण्यात आले
महाआरती
ठिकाणी सर्व
येऊन मोठ्य
करण्यात आ
गावातील भव्य
करण्यात आ
गावकरी मंडळ

दि. 19/09/2019 पे. देशोन्नती

Scanned with CamScanner

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI COLLEGE * WASHIM *

# मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय,

# वाशीम जि. वाशीम

## मराठी विभाग

## मराठी भाषा दिन अहवाल

(दि. 27 फेब्रुवारी 2020)

---

मातोश्री शांताबाई गोटे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील मराठी विभागाच्या वतीने दि. 27 फेब्रु. 2020 रोजी मराठी भाषा दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी अध्यक्ष म्हणून महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. जी.एस. कुबडे यांची उपस्थिती होती. तर प्रमुख मार्गदर्शक म्हणून डॉ. ममता इंगोले (अध्यक्ष, मराठी अभ्यासमंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती ) यांची उपस्थिती होती. मंचावर अन्य उपस्थितामध्ये डॉ. विकास चांदजकर, डॉ. दिलीप लांजेवार यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरूवात संत गाडगे बाबा यांच्या प्रतिमा पूजनाने झाली. कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. विष्णू लांडे यांनी केले. आपल्या मार्गदर्शनात डॉ. ममता इंगोले यांनी प्रत्येक मराठी भाषिकांनी आपल्या भाषेविषयीचा आदर बाळगावा असे आवाहन केले. यासोबतच आपल्या भाषेतील लोकगीते, लोककथा, म्हणी, उखाणे, वाकप्रचार यासारख्या सोकसंचिताचा संचय करून मराठी भाषेचे जतन करावे असे सांगितले. मराठी भाषा ही समृध्द करण्यासाठी प्रत्येकांनी आपला शब्दसंग्रह वाढवावा, मराठी भाषेतील विविध बोली भाषेचे जतन करावे असे सांगितले. आपल्या अध्यक्षीय मनोगतात डॉ. जी.एस. कुबडे यांनी मराठी भाषा ही समृध्द असून, तिचे जतन करण्याची जबाबदारी ही प्रत्येक मराठी भाषिकांची असल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. प्रगती कांबळे हिने तर उपस्थितांचे आभार मुस्कान नौरंगाबादी हिने मानले.

मराठी भाषा दिनाप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. ममता इंगोले

(अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)

मराठी भाषा दिनाप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. ममता इंगोले

(अध्यक्ष, मराठी अभ्यास मंडळ, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI COLLEGE * WASHIM *

मराठी भाषा दिनाप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. ममता इंगोले

मराठी दिनाच्या कार्यक्रमास उपस्थित विद्यार्थी

जिल्हाभरात 'मराठी भाषा गौरव दिन' साजरा

दै. सकाळ बातमी दि.

मराठी भाषा दिनाप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. ममता इंगोले

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI. COLLEGE * WASHIM *

मराठी भाषा दिनाप्रसंगी मार्गदर्शन करताना डॉ. ममता इंगोले

MATOSHRI SHANTABAI GOTE ARTS, COM & SCI. COLLEGE * WASHIM *